I/O 45

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** कँटोनमेंट (छावणी )
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0092 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/03/2023 00:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 09/03/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 09/03/2023
**Time From (वेळेपासून):** 15:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 10/03/2023 **Time (वेळ):** 00:18 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 004
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/03/2023 00:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय मिटमिटा , सजा चे बाजुला, पोलीस,कॉलनी पडेगाव औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** वैभव नामदेव घोळवे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1991

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | एन-9, शिवनेरी कॉलनी,सिडको, औरंगाबाद,सिडको ,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | एन-9, शिवनेरी कॉलनी,सिडको, औरंगाबाद,सिडको ,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9764608853

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अब्दुल अजिज खान पिता अब्दुल कदिर खान | | | 1. घर नं 201,गल्ली न 5म्हस्के, गल्ली, पडेगाव ,ता जि औरंगाबाद ,कँटोनमेंट (छावणी ),औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रक्कम ज्यात 500/रुपये दराच्या 40 नोटा त्यांना ॲन्थ्रोसिन पावडर लावलेली | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दिनांक 10/03/2023

मी वैभव नामदेव घोळवे वय 32 वर्षे, व्यवसाय-नौकरी, रा. एन-9, शिवनेरी कॉलनी, सिडको, औरंगाबाद ता.जी. औरंगाबाद मो.क्र. 9764608853

समक्ष हजर येवुन फिर्याद देतो की, मी दिनांक 09/03/2023 रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद यांचे समक्ष ला.प्र.वि.विभाग औरंगाबाद कार्यालयात दोन पंचा समक्ष लेखी तक्रार दिली होती ती पुढील प्रमाणे...

मी वरील प्रमाणे असुन सिडको, औरंगाबाद येथे कुटुंबासह राहतो. तसेच सामाजीक न्याय भवन कार्यालय औरंगाबाद येथे लिपीक म्हणुन नौकरी व्यवसाय करुन माझे कुटूंबाचा उदर निर्वाह करतो.

माझे वडील नामे नामदेव घोळवे यांनी दिनांक 29/06/2009 रोजी आई नामे श्रीमती चंद्रभागा नामदेव घोळवे यांचे नावे मिटमिटा शिवार गट/सर्व्हे नं. 158 मध्ये प्लॉट नं. 96 व 97 असे दोन प्लॉट खरेदी केले होते. त्यावेळी वडीलांनी सदर प्लॉटचे फेरफार घेतला नव्हता. वडील वयोवृध्द असुन आजारी असल्याने सदरचे फेरफारचे काम मलाच पाहणे होते. त्यामुळे मी सहा महिण्यापुर्वी माझे वडीलांसह जावुन सदर जागेचा फेरफार नोंद होण्या करिता खरेदीखताची झेरॉक्स प्रत मिटमिटा तलाठी कार्यालयास सादर केली होती. प्रत सादर केल्यानंतर चार महिण्याचा कालावधी उलटुनही फेरफार नोंद होत नसल्याने मी दिनांक 05/01/2023 रोजी तलाठी कार्यालय मिटमिटा येथे तलाठी साहेब यांची भेट घेण्या करिता गेलो तेंव्हा तलाठी साहेब हे कामानिमीत्त बाहेर गेले असल्याचे समजले. त्यावेळी सदर ठिकाणी एक व्यक्ती माझ्याकडे आले त्यांनी त्यांचे नाव अब्दुल अजिज खान असे सांगुन तुमचे तलाठी कार्यालयात काही काम आहे का असे विचारले त्यामळे मी त्यांना माझी आई चंद्रभागा नामदेव घोळवे यांचे नावे मिटमिटा शिवार गट/सव्हे नं. 158 मध्ये असलेल्या प्लॉट नं. 96 व 97 चे फेरफार नोंद घेणे असल्या बाबत कळविले त्यावर श्री.अब्दुल अजिज खान मला म्हणाले की, मला या भागात सर्व लोक ओळखतात आपला शब्द कोणी मोडत नाही. मी माझ्या ओळखीने तलाठी यांना बोलुन तुमचे फेरफार नोंदीचे काम करुन सर्व कागदपत्र तुमच्याकडे आनुण देतो. चिंता करु नका. श्री.अब्दुल अजिज खान यांनी ईतक्या विश्वासने सांगितल्याने मी तलाठी यांची भेट न घेता तेथुन निघुन गेलो.

त्यानंतर दिनांक 31/01/2023 रोजी श्री.अब्दुल अजिज खान यांना माझ्या फोनवरुन फोनकरुन फेरफार नोंदी बाबत विचारले असता त्यांनी मला पोलीस कॉलनी पडेगाव येथे भेटण्यास बोलावले मी सदर ठिकाणी जाऊन श्री. अब्दुल अजिज यांना भेटलो त्यावेळी श्री. अब्दुल अजिज खान मला म्हणाले की, मी तुमचे खुप जुने असलेले फेरफार नोंदीचे काम माझ्या ओळखीने तलाठी यांचे कडुन करुन देणार आहे. त्यामुळे तुमचे काम पुर्ण झाल्या नंतर मी तुमच्याशी संपर्क करेल त्यावेळी मला 20,000/-रुपये दयावे लागतील असे बोलुन माझ्या कडे लाचेची मागणी केली आहे. परंतु मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी त्यांना नाईलाजाने हो म्हणालो आहे.

दिनांक 09/03/2023 रोजी मी सकाळी दहा वाजेच्या सुमारास श्री.अब्दुल अजिज खान यांना माझ्या फोनवरुन फोनकरुन फेरफार नोंदी बाबत विचारले असता श्री. अब्दुल अजिज खान मला म्हणाले की, तुमचे फेरफार नोंदीचे काम झालेले आहे तुम्ही आज 20,000/-रु घेवुन भेटायला या असे बोलले आहे. तरी मला आज दि.

09/03/2023 रोजी श्री.अब्दुल अजिज खान, यांनी पोलीस कॉलनी पडेगाव येथे भेटण्यास बोलावले आहे त्यावेळी ते माझ्याकडे पैश्याची मागणी करुन लाच रक्कम स्विकारणार आहे. माझी श्री. अब्दुल अजिज खान यांचेशी कोणत्याही प्रकारचे वैर अगर दुश्मनी नसुन माझा व त्यांचा कोणत्याही प्रकारचा उसनवारीचा किंवा पैसे देण्या-घेण्याचा व्यवहार नाही. तरी श्री. अब्दुल अजिज खान यांनी माझेकडे लाच मागणी करुन लाच रक्कम स्विकारल्यास त्यांचेवर कारवाई होणेस विनंती आहे.

○. मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी बोलविलेले शासकिय पंच क्र. 1 श्री. शेख युनुस शेख युसुफ वय 42 वर्षे, व्यवसाय नौकरी, पद-शिपाई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा [illegible] व पंच क्र. 2. श्री.अजिमखान महेबुबखान वय 49 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद-कनिष्ठ लिपिक, वार्ड नं.5, एन5 सिडको, म.न.पा. औरंगाबाद, असा आमचा ओळख परिचय करुन दिला. त्यानंतर मी थोडक्यात तोंडी तक्रार पंच व पो.नि.श्रीमती सौदागर यांना सांगुण माझी लेखी तक्रार दिली त्यावर मी, दोन्ही पंचानी व पो.नि. श्रीमती रेशमा सौदागर यांनी स्वाक्षरी केल्या.

माझ्या तक्रारीचे अनुषंगाने पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांनी शासकिय पंच व सर्वानुमते श्री.अब्दुल अजिज खान यांची दिनांक 09/03/2023 रोजी पोलीस कॉलनी पडेगाव, औरंगाबाद येथे जावुन लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर पो.नि. श्रीमती रेशमा सौदागर, सापळा पथक व शासकिय पंच असे सापळा कारवाईकामी लागणारे साहित्यासह खाजगी वाहनाने ला.प्र.वि. कार्यालय औरंगाबाद येथुन रवाना होवुन पडेगाव पोलीस कॉलनी औरंगाबाद चे आलीकडे सुरक्षीत ठिकाणी थांबलो तेथुन माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन पंच क्र. 1 श्री. शेख युनुस शेख युसुफ, पद-शिपाई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापिठ औरंगाबाद, यांचेसह आम्हाला माझे मो.सा. वर रवाना केले. पोलीस कॉलनी पडेगाव येथील मिटमिटा तलाठी सजा कार्यालय येथे गेल्यानंतर मी श्री.अब्दुल अजिज खान, यांना फोनव्दारे संपर्क केला असता श्री. अब्दुल अजिज खान येतो असे म्हणुन पाच ते सहा मिनिटात सदर ठिकाणी आले. व पंच क्र. 1 यांचे समक्ष श्री.अब्दुल अजिज खान मला म्हणाले की, तुमचे काम झाले आहे. देवुन टाका 20000/-रुपये असे म्हणुन पैश्याची मागणी करुन ते स्विकारण्याचे मान्य केले आहे., सदर लाचेची रक्कम मिटमिटा तलाठी सजा कार्यालय, पोलीस कॉलनी पडेगाव येथे घेवुन येण्याचे सांगितले आहे.

त्यानंतर मी पंचासह सुरक्षीत ठिकाणी परत आलो व सापळा अधिकारी पो.नि.श्रीमती रेशमा सौदागर यांना पंच क्र.1 यांनी व मी सर्व हकिगत सांगितली त्यावरुन सर्वानुमते लगेचच दिनांक 09/03/2023 रोजी मिटमिटा तलाठी सजा कार्यालय, पोलीस कॉलनी पडेगाव येथे लाचेचा सापळा आयोजीत करण्यात आला. सापळा कारवाईच्या वेळी श्री. अब्दुल अजिज खान यांना लाच म्हणुन देण्या करिता मी हजर केलेली 20000/- रुपये रक्कम ज्यात 500/-रुपये दराच्या 40 नोटा त्यांना ऍन्थ्रोसिन पावडर लावुन माझ्या पॅन्टच्या समोरिल उजव्या बाजूच्या खिश्यात ठेवण्यात आल्या. माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्रमांक क्र.1 श्री. शेख युनुस शेख युसुफ, असे अम्हाला श्री. अब्दुल अजिज खान यांचे भेटीकरिता सुरक्षीत ठिकाणावरुन रवाना केले. त्यानंतर मी पंच क्र.1 श्री. शेख युनुस असे माझ्या मो.सा.वर सोबत जाऊन मिटमिटा तलाठी सजा कार्यालयाचे बाजुला, पोलीस कॉलनी पडेगाव येथे थांबलो थोडया वेळाने श्री. अब्दुल अजिज खान यांना फोन आला व मला कुठे आहे असे विचारले मी त्यांना तलाठी कार्यालय मिटमिटा सजा चे बाजुला, पोलीस कॉलनी पडेगाव येथे असल्याचे सांगितले त्यानंतर लगेचच ते सदर ठिकाणी आले त्याचेवळी मी म्हणालो की, हे घ्या तुम्ही मागितल्या प्रमाणे 20000/-हजार रुपये आणले आहे मोजुन घ्या, असे म्हणुन माझ्या पॅन्टच्या समोरिल उजव्या बाजूच्या खिश्यातुन लाचेची रक्कम उजव्या हाताने काढून श्री. अब्दुल अजिज खान यांचे समोर धरली असता त्यांनी पंच क्र. 1 यांचे समक्ष सदरची लाचेची रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्वत: स्विकारुन हातामध्येच ठेवली. लाचेची रक्कम 15.40 वाजेच्या सुमारास स्विकारल्यानंतर मी सापळा पथकास दिसेल अश्या रितीने पुर्वनियोजीत ईशारा केला असता, सापळा पथकातिल अधिकारी, कर्मचारी व पंच असे घटनास्थळी हजर आले. व पोलीस निरीक्षक श्रीमती रेशमा सौदागर यांनी लोकसेवक श्री. अब्दुल अजिज खान यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेतले त्यांना आपला व सापळा पथकाचा परिचय देवुन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अब्दुल अजिज खान पिता अब्दुल कदिर खान वय 49 वर्षे, व्यवसाय-ड्रायव्हर, रा. घर नं. 201, गल्ली नं. 5 म्हस्के गल्ली, पडेगाव औरंगाबाद ता.जि. औरंगाबाद असे सांगितल. त्यानंतर श्रीमती रेशमा सौदागर सापळा पथक दोन्ही पंच मी व श्री. अब्दुल अजिज खान असे तेथुन निघून पोलीस लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय औरंगाबाद येथे आलो. सदर घटने बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला.

तरी दिनांक 09/03/2023 रोजी खाजगी ईसम श्री. अब्दुल अजिज खान यांनी माझे आई नामे श्रीमती चंद्रभागा नामदेव घोळवे यांचे नावे मिटमिटा शिवार गट/सर्व्हे नं. 158 मध्ये खरेदी केलेले प्लॉट नं. 96 व 97 चे फेरफार

नोंदी त्यांचे ओळखीने व्यक्तीगत प्रभावाचा उपयोग करुन तलाठी यांचेकडुन करुन घेवुन सदरचे फेरफारचे कागदपत्र काढुन देण्यासाठी म्हणुन माझ्याकडे पंचसाक्षीदारा समक्ष 20000/-रुपये लाचेची मागणी करुन सदरील लाच रक्कम 20000/-रुपये मिटमिटा तलाठी सजा कार्यालयाचे बाजुला, पडेगाव पोलीस कॉलनी औरंगाबाद येथे पंचसाक्षीदार समक्ष माझ्याकडुन स्वत: श्री. अब्दुल अजिज खान यांनी 15.40 वाजता स्विकारली आहे. तरी अब्दुल अजिज खान पिता अब्दुल कदिर खान वय 49 वर्षे, व्यवसाय-ड्रायव्हर, रा. घर नं. 201, गल्ली नं. 5 म्हस्के गल्ली, पडेगाव
[illegible] कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.
माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे माझे समक्ष मराठीत संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन मी वाचुन पाहिली माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.
समक्ष हि फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

KAILASH CHANDRAKANT DESHMANE(I (Inspector)) / pi **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणाऱ्याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ड्युटी अधिकारी
पोलीस ठाणे छावणी
औरंगाबाद शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): KAILASH CHANDRAK
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pi